2 3 MAR 2026

तरूण भारत

# सीपीआर, नीम करौली ट्रस्टतर्फे उद्या विद्यापीठात आरोग्य तपासणी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभाग, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय (सीपीआर) व नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.२४ रोजी 'आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे" आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील कर्मचारी व विद्यार्थ्यांचे संपुर्ण आरोग्य तपासणी मोफत करण्यात येणार आहे. या शिबिराचे उद्घाटन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात सकाळी १०.१५ वाजता शिबिराला प्रारंभ होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, कुलसचिव डॉ. व्ही एन शिंदे, सीपीआरचे अधिष्ठाता रुग्णालय डॉ. सदानंद भिसे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. भूषण मिरजे, व्यवस्थापन परिषदेचे स्वागत पिरुळकर, भौतिकशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे, नीम करौली बाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या शीतल सोनकवडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला, उपचार व संदर्भ सेवा दिली जाणार आहे. जनरल मेडिसिन, स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग, नेत्रतपासणी, दंतचिकित्सा, कान–नाक–घसा आणि हृदयविकार, पूर्ण रक्त व लघवी तपासणीची सोय उपलब्ध असेल. गरजूंना आवश्यक औषधे विनामूल्य दिली जातील. सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान करण्याची संधीही येथे उपलब्ध असेल. हे शिबिर प्रामुख्याने विद्यापीठातील विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी असून, मर्यादित संख्येने नागरिकही यात सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एम. आर. वाईकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
2 3 MAR 2026 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाच्या वतीने मराठीतील ज्येष्ठ लेखक व संशोधक, तसेच 'संशोधन पद्धती : प्रक्रिया-अंतरंग वाङ्मयीन विद्वता, 'साहित्य आणि संस्कृती'' या ग्रंथांचे लेखक डॉ. दु. का. संत व्याख्यानाचे आयोजन केले आहे. मंगळवार दि. २४ रोजी सकाळी ११.३० वाजता व्याख्यानाला सुरूवात होणार आहे.

'डॉ. दु. का. संत जीवन आणि कार्य'' विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ. अविनाश सांगोलकर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित राहणार असुन उदयप्रकाश संत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

2 3 MAR 2026

तरूण भारत

# 'शिक्षण, रोजगार, सक्षमीकरणाने महिलांचा विकास'



डॉ. प्रशांत नारनवरे

**कोल्हापूर :** महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण, रोजगार आणि सक्षमीकरण ही त्रिसूत्री अत्यंत महत्त्वाची आहे. या त्रिसूत्रीच्या आधारावर महिलांना सक्षम करून त्यांच्यातून नेतृत्व विकसित करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठात बेटी बचाव अभियान, विद्यार्थी विकास विभाग आणि स्वयंसिद्धा सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवाजी विद्यापीठात आयोजित स्वयंसिद्धा पोर्टलविषयक कार्यशाळेत ऑनलाईन मार्गदर्शन करताना महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे कार्यशाळेत ते बोलत होते. 'स्वयंसिद्धा, स्त्रीशक्ती पोर्टल आणि आदिशक्ती" या विषयावर त्यांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

यावेळी लोकभवनचे अवर सचिव (शिक्षण) विकास कुलकर्णी यांनीही ऑनलाईन संवाद साधला. कार्यशाळेत एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या स्वयंसिद्धा नोडल ऑफिसर डॉ. अनुराधा पोतदार यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, शिक्षण, स्वास्थ्य, स्वावलंबन, सामाजिक न्याय, संवेदनशीलता आणि समानता या सहा बाबींवरच महिलांचे सक्षमीकरण अवलंबून आहे. बेटी बचाव अभियानाच्या डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत केले. डॉ. उज्ज्वला बिर्जे, सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले. आकाश ब्राह्मणे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. तानाजी चौगुले, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

2 3 MAR 2026
तरुण भारत

# विद्यापीठात जीएसटीबाबत आज राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे सोमवारी (दि. २३) दोनदिवसीय 'जीएसटी" (वस्तू आणि सेवा कर) याविषयी राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या चर्चासत्रात जीएसटी सुधारणा, त्याचे परिणाम आणि 'विकसित भारत २०४७" या मुख्य मुद्द्यावर जीएसटी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. जीएसटी आयुक्त सुरेंद्र माणकोस्कर यांच्यासह कलबुर्गी केंद्रीय विद्यापीठाचे प्रा. पांडुरंगा हे चर्चासत्राचे मुख्य मार्गदर्शक आहेत. विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असणार आहेत. जीएसटीमधील सुधारणा व त्याचा व्यवसाय व ग्राहकांवर परिणाम या विषयावर विशेष चर्चेचे आयोजन चर्चासत्रामध्ये करण्यात आलेले आहे यामध्ये आयुक्त महेश जगताप, सीए गिरीश सामंत, व्यावसायिक अजित कोठारी, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगुले, सीए श्रीकांत बच्चे चर्चेत सहभाग होणार आहेत. याचे अध्यक्षस्थान प्रा. श्रीकृष्ण महाजन भूषवतील. धारवाड येथील प्रा. अंजू ताम्रगुंडी व गोवा येथील प्राचार्य डॉ. नामदेव गवस, कौशाली इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, धारवाड येथील डॉ. रमेश कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रासाठी देशभरातून १०० हून अधिक सदस्यांनी नोंदणी केलेली असून सुमारे ५० सहभागी सदस्य शोधनिबंध सादर करणार आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.